मार्गदर्शक पुस्तिका क्र. 3

(मॅन्युअल - 3)

निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पध्दत, पर्यवेक्षण आणि जबाबदारी.

**निर्णय प्रक्रियेची पध्दत**

व्यवस्थापक सहाय्यक व्यवस्थापक ह्यांच्यामार्फत प्रस्ताव तयार करण्यात येतात व ते विविध यंत्रणेमार्फत म्हणजेच मुख्य लेखापाल (वित्तीय बाबीसंबंधात), नगर अभियंता (उभारणी, पुनर्स्थापना आणि व्यापक दुरुस्ती इ. संबंधात), विधि अधिकारी (कायदेशीर बाबीसंबंधात), उप आयुक्र, अति. आयुक्त व आयुक्त ह्यांना विषयवार व बाबीचे गांभीर्य पाहून मंजुरीसाठी सादर करण्यात येतात.

सक्षम प्राधिकाऱयांची निर्णय सदस्यांस/जनतेस व्यवस्थापक/सहाय्यक व्यवस्थापक किंवा उप आयुक्त ह्यांजमार्फत कळविण्यात येतात.

**विविध स्तरावरील कार्यालये पुढील प्रमाणे आहेत:**

1) वित्तिय बाबींसाठी संबंधित विभागातील लेखा अधिकारी.

2) किरकोळ दुरुस्तींच्या बाबीसंबंधात उपाययोजना करण्यासंबंधात संबंधीत विभागातील सहाय्यक अभियंता (परिरक्षण).

3) जलतरण तलाव उभारणीच्या पुनर्दुरुस्ती/व्यापक दुरुस्ती, संबंधीत बाबीसाठी नगर उप अभियंता (नियोजन व संकल्पचित्रे).

4) तरण तलाव आणि गाळणी संयंत्र विद्युत विषयक उभारणी संबंधातील समस्यांबाबत कार्यकारी अभियंता (यांत्रिक व विद्युत).

5) पोलीस आयुक्तांकडून परवाना मिळविण्यासाठी त्याचे पुनर्नुतनीकरन करण्यासाठी संबंधीत विभागातील वैद्यकीय आरोग्य

अधिका-यांकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येते.

निर्णय प्रकरणी अंतीम प्राधिकारी महानगरपालिका आयुक्त / अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त / महानगरपालिका उप आयुक्त आहेत.

निर्णय घेण्यासंबंधातील महत्त्वाची बाब म्हणजे जलतरण क्रिडा विषयका संबंधातील शुल्क सुधारणा होय. जनतेस मनोरंजनविषयक सेवा पुरविण्यासाठी असलेल्या विद्यमान शुल्क अनुसुचीनुसार महानगरपालिकेस झालेला नफा / तोटा विचारात घेऊन शुल्क अनुसूचीत घट / वाढ करण्यासाठी परिपत्रक क्र .सीए/एफआरएम/07, दि.03-05-2011, कार्यालयीन निर्देश क्र.सीए/एफआरएम/579ए, दि.22-02-2013 आणि क्र .सीए/एफआरएम/4690, दि.24-02-2014 प्रमाणे महानगरपालिकेतील विविध खात्यांच्या आकार /शुल्क सूचीमध्ये प्रतिवर्षी नियमित

वाढ करण्यात येते . सन 2014-15 मधील शुल्कवाढीचा तक्ता जलतरण परिसरात प्रसारीत करण्यात आलेला आहे. तसेच यासोबत संलग्नित आहे. महानगरपालिका सह आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन) यांची मंजुरी मिळाल्यानंतर सुधारित शुल्क अनुसूची सूचनाफलकावर प्रदर्शित करुन सदस्यांस /जनतेस कळविण्यात येते.

निर्णय प्रकरणी अंतर्भूत असलेले अधिकारी महानगरपालिका सह आयुक्त (आपत्कालीन व्यवस्थापन) असून, त्यांचे कार्यालय, बकरी अड्डा, ना.म.जोशी मार्ग, भायखळा (पश्चिम), मुबई - 400 027 येथे आहे. त्यांचा दुरध्वनी क्रमांक 23089217 आहे.

निर्णय प्रकरणी समाधान न झाल्यास, संबंधीत अति. महानगरपालिका आयुक्त अथवा महानगरपालिका आयुक्त यांचेकडे विनंती करता येते.

**सरदार वल्लभभाई पटेल जलतरण तलाव शुल्क सूची दिनांक01-04-2014 पासून**

| अ.क्र. | वर्णन | सुधारित आकार |
|---|---|---|
| 1 | सभासद प्रवेश अर्ज | रु.50/- अधिक मुल्यवर्धित करासह (रक्कम पुर्णांकात) = रु.53/- |
| 2 | प्रवेश शुल्क | रु.484/- |
| 3 | निर्देशक शुल्क | रु.484/- |
| 4 | वार्षिक सभासद (सर्वसाधारण) | रु.2910/- |
| 5 | वार्षिक सभासद (सवलतीचे दर) | 50% केवळ सर्वसाधारण सभासद शुल्कात |
| 5 | खण शुल्क | रु.540/- प्रती वर्षी |
| 6 | प्रासंगिक पोहण्यासाठी तिकिट | रु.100/- |
| 7 | सभासद दुय्यम कार्ड | रु.121/- |
| 8 | विलंब शुल्क (सर्वसाधारण) | रु.200/- प्रतीमाह |
| 9 | विलंब शुल्क (सवलतीचे दर) | रु.150/- प्रतीमाह |